# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**उप मुख्यमंत्री** : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सुरु असलेल्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात सिमेंटच्या रस्त्यांची तसेच फुटपाथची बांधकामे सुरु असून सदर कामे करीत असताना झाडांच्या सुरक्षेकडे लक्ष न दिल्याने सुमारे ७ लाख झाडांचे अस्तित्व नष्ट होण्याचा धोका निर्माण झाल्याचे दिनांक ७ जून, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे, ठाणे शहरात विविध ठिकाणी काँक्रीटने वेढलेली झाडे काँक्रीटमुक्त करावीत व त्यांना मोकळा श्वास घेता यावा, यासाठी राष्ट्रीय हरित लवादाने सन २०१५ साली सर्व शहरांसाठी दिलेल्या महत्वाच्या आदेशाचे ठाणे महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीकडून दुर्लक्ष झाल्याची बाब उघड होणे, यामुळे शहरातील ७ लाखांपर्यत झाडे नष्ट होणार असल्याने शहरातील शुद्ध हवा उपलब्ध होण्यावर अनिष्ट परिणाम होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, सन २०१८ मध्ये वृक्ष कोसळल्याने मृत पावलेले वकील किशोर पवार यांच्या पत्नीला ठाणे महानगरपालिकेत कंत्राटी पद्धतीवर नोकरी देण्यात येणे परंतु, अद्याप त्यांना सेवेत कायम न करणे, तर कोलबाड येथे पिंपळवृक्ष कोसळून अर्पिता वालावलकर यांचा मृत्यु झालेला असणे, परंतु, अद्यापपर्यंत महानगरपालिकेने कोणतीही मदत केलेली नसणे, तसेच त्यांच्या कुटुंबातील कोणालाही नोकरी देण्यात आलेली नसणे, एकंदरितच ठाणे महानगरपालिकेच्या गलथान कारभारामुळे शहरातील वृक्ष मोठ्या प्रमाणात नष्ट होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भुसावळ हे रेल्वेचे मोठे जंक्शन असून येथून भारतात कोठेही जाण्यास रेल्वे उपलब्ध असणे, जिल्ह्यातून भुसावळ रेल्वे स्टेशनवर येणाऱ्यांची संख्या मोठी असणे, भुसावळ रेल्वे स्टेशनला लागूनच शासकीय बस स्टँड असणे, भुसावळ तालुक्याचे ठिकाण असल्याने व रेल्वे स्टेशन जवळ असल्याने तालुका जिल्हा व जिल्ह्याबाहेरील लोकांची बस स्टँड वर होणारी गर्दी व त्यासाठी बस स्टँडवर पुरेशा सुविधा नसणे, बस स्टँडची अतिशय दुरवस्था झालेली असणे, बस स्टँडवर पाण्याचे डबके साचणे, परिणामी दुर्गंधी पसरून प्रवाशांना होणारा त्रास दूर करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी भुसावळ येथे बस पोर्ट उभारण्याची घोषणा करणे, परंतु त्यावर कोणतीही कारवाई न होणे, भुसावळ शहरातील रस्ते अरुंद असल्याने परिवहन विभागाच्या मालकीच्या जागेत फक्त लांब पल्ल्याच्या बसेससाठी बस स्टँड उभारण्याची आवश्यकता, मात्र रेल्वे स्टेशन जवळ जिल्ह्यातील बसेससाठी बस पोर्ट उभारण्यात होणारी दिरंगाई, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री.रोहित पवार, संजय जगताप, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, संग्राम थोपटे, अमीन पटेल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शिक्षण, नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने परराज्यासह विदेशातील तरुण-तरुणी मोठ्या संख्येने पुण्यात वास्तव्यास असणे, विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहर व परिसरात माहे जानेवारी, २०२३ ते माहे मे, २०२३ च्या दरम्यान तब्बल सात कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये कॅथा इडूलीस खत हा अमली पदार्थ देखील सेवन केला जात असल्याचा प्रकार समोर आलेला असणे, पुणे शहरात विदेशी नागरिकांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची विक्री होत असणे, पुणे शहरात अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने नायजेरियन गुन्हेगार आघाडीवर असल्याचे दिसून येणे, गोवा, मुंबई येथून कोकेन, ब्राऊन शुगरची तस्करी पुण्यात होत असणे, पुणे शहरातील कोरेगाव पार्क, मुंढवा, बाणेर, हिंजेवाडी येथील उच्चभ्रू परिसरातील पब, हॉटेलमध्ये त्याची ग्राहकांना विक्री करीत असल्याचे दिसून येणे, अमली पदार्थ पोहोचविण्यासाठी चक्क डंझो ॲपचा वापर करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येणे, अमली पदार्थ विकत घेण्यासाठी पेडलर आणि ग्राहक म्हणजे विकत देणारे आणि विकत घेणारे हे पोलिसांच्या किंवा तपासयंत्रणाच्या लक्षात येऊ नये म्हणून कोडवर्डमध्ये एकमेकांशी संवाद साधत असून यासाठी ते व्हाट्सअपवरील इमोजीचा वापर करत असणे तसेच विशिष्ट अमली पदार्थासाठी विशिष्ट प्रकारच्या इमोजी वापरल्या जात असणे, एकीकडे अमली पदार्थविरोधी सप्ताह साजरा करण्यात येत असताना दुसरीकडे अमली पदार्थ खरेदी विक्रीसाठी वेगवेगळ्या नव्या क्लुप्त्या शोधल्या जात असल्याने तस्करांना रोखण्याचं मोठं आव्हान आता

पोलिसांसमोर निर्माण झालेले असणे, अमली पदार्थांच्या विक्रीत वाढ होत असल्याने शहराच्या तरुणाईचे भविष्य अंधकारमय होण्याची दाट शक्यता असणे, तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न बिकट होत असल्याची बाब लक्षात घेऊन अमली पदार्थांची तस्करी व विक्री रोखण्याबाबत शासनाची भूमिका व शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(४) **श्री.विनोद निकोले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातील वेवजी ग्रामपंचायती नंतर शेजारच्या झाई गावाच्या जमिनीवर गुजरात राज्याने अतिक्रमण केल्याचा मुद्दा स्थानिकांनी उपस्थित करणे, या प्रकरणी पालघरचे मा. जिल्हाधिकारी यांनी सीमा भागातील दोन्ही गावांना नुकतीच भेट देणे, तलासरी तालुक्यातील ग्रामस्थांना गुजरात राज्यातील उंबरगाव तालुक्यातील गोवाडा ग्रामपंचायतीने आपल्या जागेवर घरे बांधल्याचे सांगून सन २०२० साली घरे रिकामे करण्याची नोटीस झाई ता. तलासरी जि. पालघर या महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना देणे, त्यामुळे सीमाभागातील नागरिकांना संघर्ष करावा लागत असणे, महाराष्ट्र कर्नाटक सीमा वादाचा मुद्दा चर्चिला जात असतानाच आता महाराष्ट्र - गुजरात सीमा वाद निर्माण होत असणे, त्यामुळे या संदर्भात मा. जिल्ह्याधिकाऱ्यांनी महसूल व भूमी अभिलेख या विभागाला जमिनीची पूर्वीची कागदपत्रे व नकाशा गोळा करण्याच्या सूचना दिल्या असणे, तसेच वेवजी गावातील जमिनीवर गुजरातच्या सोलसुंभा ग्रामपंचायतीने अतिक्रमण केलेल्या भागातही त्यांनी भेट देणे, त्यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित असणे, त्यामुळे राज्याराज्यात संघर्ष तीव्र होऊन सीमा वाद वाढण्याची शक्यता निर्माण होत असणे, त्यामुळे दिनांक १ मे, १९६० रोजी अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्राच्या सीमेप्रमाणे कायम करण्यासाठी गरज निर्माण होणे, तसेच, राज्य शासनाने राज्यात संपूर्ण सीमा भागात चेक पोस्ट सतत कार्यरत ठेवण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री. सुनिल केदार, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. अमित देशमुख, विकास ठाकरे, अमीन पटेल, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री प्राजक्त तनपूरे, चेतन तुपे, रविंद्र वायकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. संजय केळकर, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. वैभव नाईक, सुनिल प्रभू, अतुल भातखळकर, योगेश सागर, नाना पटोले, अजय चौधरी, मोहन मते, दिलीप मोहिते-पाटील, रोहित पवार, उदयसिंग राजपुत, संजय गायकवाड, प्रकाश सुर्वे, प्रताप सरनाईक, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर येथील विदर्भ ट्रॅव्हल्सची ए एच २९ बीई १८१९ ही वातानुकूलित बस दिनांक ३० जून, २०२३ रोजी नागपूरहून हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाने सायंकाळी ३२ प्रवाशांना घेऊन पुण्यासाठी निघाली असणे, रात्री वाशिम जिल्हयातील कारंजा येथील राधाकृष्ण हॉटेलमध्ये बसमधील प्रवाशांनी जेवण करणे, त्याठिकाणावरून बसचा चालक बदलणे, कारंजाजवळ असलेल्या इंटरचेंजवरून बस हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गावर पुण्याला जाण्यासाठी मार्गस्थ होणे, सिंदखेड राजाकडे जातांना मध्यरात्रीनंतर दीडच्या सुमारास पिंपळखुटा गावानजिक भीषण अपघात होऊन बसला आग लागणे,या भीषण आगीत २५ प्रवासांचा होरपळून मृत्यू होणे तर ७ जण गंभीर जखमी होणे, बुकिंग घेतांना प्रवाशांची पुर्ण नावे घेतलेली नसल्यामुळे बसमध्ये असलेल्या प्रवाशांची नोंद ट्रॅव्हल्स एजन्सीकडे नसणे, त्यामुळे होरपळून मृत्यू झालेल्या २५ जणांची ओळख पटविणे प्रशासनाला त्रासदायक ठरणे, अपघातग्रस्त ट्रॅव्हल्स ही पोलीस उपनिरिक्षकांच्या पत्नीच्या नावाने असणे, सदर बसकडून ११ वेळा वाहतूक नियमांचा भंग करण्यात येणे, या बसची पीयूसी मुदत माहे मार्च, २०२३ मध्ये संपलेली असतांना सुध्दा सदर बस राजरोसपणे प्रवाशांना घेऊन प्रवास करणे, बसचा अपघात झाल्यानंतर विम्याची रक्कम मिळविण्यासाठी सदर ट्रॅव्हल्स एजन्सीच्या मालकाकडून जळलेल्या बसची चक्क दिनांक १ जुलै, २०२३ रोजी यवतमाळ येथील एका पीयुसी केंद्रावरून पीयुसी काढण्यात येणे, नियमानुसार पीयुसी काढतांना वाहनाची तपासणी करूनच पीयुसी देणे बंधनकारक असतांना सुध्दा नियमाची पायमल्ली करून पीयुसी हस्तगत करणे, परिवहन विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने व आर्थिक देवाणघेवाणातून राजरोसपणे अनेक नियमबाह्य ट्रॅव्हल्स एजन्सीचे बसेस प्रवाशांना घेऊन वाहतूक करणे, यातील अनेक बसेस हे शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या गुतंवणूकीतून असणे, यात मोठ्या प्रमाणात आरटीओ व पोलिस विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असल्याने नियमबाह्य सुरू असलेल्या ट्रॅव्हल्सची कोणतीही चौकशी न करता राजरोसपणे प्रवाशांना घेऊन रस्त्यावर वाहकतूक करणे, नागपूर वरून मुंबईकडे जाण्यासाठी अगोदरच चांगला रस्ता असतांनासुध्दा व नागरिकांची मागणी नसतांना सुध्दा हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाची निर्मिती करण्यात येणे, या महामार्गाच्या निर्मितीसाठी करोडो रूपये खर्च करण्यात येणे, अनेक शेतकऱ्यांची फसवणूक करून अधिकाऱ्यांनी व भुमाफीयांनी शेतकऱ्यांच्या जमिनी शेतकऱ्यांकडून काडीमोल भावाने खरेदी करून शासनास दामदुप्पटीने विकणे, या रस्त्याच्या कामासाठी कंत्राटदाराकडून वापरण्यात आलेल्या रेती, माती, मुरूम यावरील करोडो रूपयांचा महसूल शासनाने माफ करून कंत्राटदारांना फायदा करून देणे, रस्ते हे विकासाचे प्रतिक असतात असे म्हटले जाते मात्र विकासाचे हेच प्रतिक विनाशाचे कारण बनल्याचे भयावह चित्र गेल्या काही दिवसांपासून बघायला मिळणे, दिनांक ११ डिसेंबर, २०२२ ते दिनांक १ जुलै, २०२३ या २०१ दिवसांत १,२८७ अपघात झाले असून ९५ पेक्षा अधिक निरपराध व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागणे, या अपघातामुळे अनेकांची कुटूंबे उध्वस्त होत असल्यामुळे नागरिकांत पसरलेले भीतीचे वातावरण, त्यामुळे उपरोक्त प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी करण्याची व संबंधितांवर कठोर कारवाई

करण्याची मागणी नागरिकांनी करणे, मात्र या मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजाची भावना, परिणामी या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री.संजय केळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ठाण्यामधील खाजगी नर्सिंगचे प्रमाणपत्र ग्राह्य मानले जात नसल्याचे कारण पुढे करत कोणतीही पूर्वसूचना न देता ६० हून अधिक नर्सेसना आपला दवाखान्याच्या संचालकांनी कामावरून तडकाफडकी कमी करणे, सदर बाब दिनांक ७ जून, २०२३ रोजी निदर्शनास येणे, तसेच काम करूनही संबंधित कर्मचाऱ्यांना दोन महिन्याचे वेतन देखील अदा न करणे, त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येणे, या प्रकरणी अन्यायग्रस्त परिचारिकांनी आरोग्य विभागाकडे धाव घेणे, मात्र त्यांना कोणत्याही प्रकारचा दिलासा शासनाकडून न मिळणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३

(२) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ — महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरिष चौधरी, कुणाल पाटील व मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरिष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरिष चौधरी, कुणाल पाटील व मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरिष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, अॅड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरिष चौधरी, कुणाल पाटील व मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र**

**प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरिष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) **(क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरिष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख,**

**विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सहा : डॉ.किरण लहामटे, सर्वश्री रणधीर सावरकर, सदा सरवणकर, बाबासाहेब पाटील, डॉ.संजय कुटे, सर्वश्री चिमणराव पाटील, दिलीप मोहिते-पाटील, जयकुमार रावल, राजेंद्र पाटणी, भरतशेठ गोगावले, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, राजेश पवार, संजय शिरसाठ, दत्तात्रय भरणे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री आकाश फुंडकर, प्रताप सरनाईक, यशवंत माने, समीर कुणावार, तुषार राठोड, संजय रायमुलकर, दौलत दरोडा, हरिष पिंपळे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री संग्राम जगताप, प्रकाश भारसाकळे, हरिभाऊ बागडे, मंगेश कुडाळकर, शेखर निकम, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, बाळासाहेब आजबे, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, ज्ञानराज चौगुले, संजय गायकवाड, ॲड.शहाजीबापू पाटील, श्रीमती नमिता मुदंडा, सर्वश्री अनिल बाबर, सुहास कांदे, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती लताबाई सोनावणे, ॲड आशिष जयस्वाल, सर्वश्री रमेश बोरनारे, समाधान आवताडे, दादाराव केचे, जयकुमार गोरे, राम सातपुते, सुभाष देशमुख, सुरेश भोळे, किर्तीकुमार बांगडीया, प्रशांत बंब, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री संताष दानवे, विनोद अग्रवाल, प्रकाश आवाडे, रत्नाकर गुट्टे, संतोष बांगर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडित असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व

उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील "पंचामृत" संकल्पनेत "शाश्वत शेती - समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरु ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरु करणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इ.जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इ.धोरणे कार्यान्वीत करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात "बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मिशन २०२५ "कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या हप्त्याचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेच्या धर्तीवर "मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर" हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी "काजू फळपिक विकास योजना" लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक

आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना" आणि "गोमाई मूल्यवर्धन योजना" या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि 'सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना' राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(१) ॲड. राहूल कुल, वि.स.स.**

"पुणे शहराची तहान भागविण्यासाठी टाटा पॉवर कंपनीकडून भिरा जलविद्युत केंद्रात वीज निर्मिती केल्यानंतर समुद्रात सोडण्यात येणारे मुळशी धरणातील पाणी पुण्यासाठी वापरण्याबाबत" या विषयावरील श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांच्या दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १४२ मधील प्रश्न क्रमांक ५२६६० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) ॲड. राहूल कुल, वि.स.स.**

"ग्रोमोअर व इतर विविध योजनेंतर्गत झुडपी वने व राखीव वनक्षेत्रे यांच्या प्रस्तावासाठी स्वतंत्र एजन्सीची नेमणुक करण्याबाबत" या विषयावरील ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांच्या दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १३९ मधील प्रश्न क्रमांक ४८९७९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा